कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
कार्यासन - ३०.

विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दि.३०.०७.२०१४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक ३०.०७.२०१४ रोजी दुपारी ०२.०० वाजता मा. अध्यक्ष तथा कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.दि.सो.राजपूत | : उपसचिव, (कामगार) |
| २. | श्री.श्रीनिवासन | : उप आयुक्त, केंद्र शासन प्रतिनिधी |
| ३. | श्री. अनिल ढवळे | : मालक प्रतिनिधी |
| ४. | श्री.रमेश सो. सारडा | : मालक प्रतिनिधी |
| ५. | श्री.प्रकाश मा.देवतळे | : मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. राजेश फुले | : कामगार प्रतिनिधी |
| ७. | श्री. दादाराव डोंगरे | : कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्रीमती राधिका गायकवाड | : कामगार प्रतिनिधी |
| ९. | श्री. मुनवर शेख | : कामगार प्रतिनिधी |
| १०. | श्रीम.निलांबरी भोसले | : सचिव तथा सहायक कामगार आयुक्त, मुंबई. |

सर्वप्रथम मा. अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली.

मुद्दा क्र.१) मागील दि.१६.०१.२०१४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे.

मंडळाच्या दिनांक १६.०१.२०१४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त दिनाक ०५.०२.२०१४ रोजी शासनास सादर करण्यात आले असल्याचे मा.अध्यक्षांनी उपस्थितांना सांगितले. श्री.डोंगरे,कामगार प्रतिनिधी यांनी मंडळाकडे सादर केलेल्या दि.१६.०१.२०१४ इतिवृत्तांची प्रत सदर बैठकीचे इतिवृत्त शासनास सादर केल्याच्या तारखेनंतर प्राप्त झाल्याने सदर

इतिवृत्ताची नोंद घेण्यात आली नसल्याचे मा.अध्यक्षांनी स्पष्ट केले. श्री.डोंगरे यांनी पाठविलेल्या इतिवृत्तांत त्यांनी केलेल्या सूचनांवर आजच्या बैठकीत चर्चा करता येईल असेही मा.अध्यक्षांनी सांगितले. त्यास सर्वांनी सहमती दर्शवत मंडळाने शासनास पाठविलेले इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यात आले.

मुद्दा क्र.२) **मंडळाच्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून जिल्हास्तरीय कामगार उप आयुक्त/सहायक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी यांना शासन निर्णय दिनांक १८ जून, २०१४ अन्वये अधिकार प्रदान केल्याबाबत.**

मंडळाच्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांस अधिकार प्रदान केल्याबाबतची माहिती मा.अध्यक्षांनी सर्व उपस्थितांस दिली. आतापर्यंत जिल्ह्यास्तरावरुन बांधकाम कामगारांचे सर्व योजनांतर्गत प्राप्त होणारे अर्ज मंडळाकडे येत असत व त्यानुसार पात्र असलेल्या बांधकाम कामगारांना मंडळामार्फत लाभ प्रदान करण्यात येत असे. तथापि, सदर कारवाईस वेळ लागत नसे. म्हणून मंडळाच्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने शासन निर्णय दिनांक १८ जून, २०१४ अन्वये जिल्हास्तरीय कामगार उप आयुक्त / सहायक कामगार आयुक्त / सरकारी कामगार अधिकारी यांना अधिकार प्रदान करण्यात आले असल्याचे मा.अध्यक्षांनी सर्व उपस्थित सदस्यांना सांगितले. सदर शासन निर्णय सर्व सदस्यांस देण्यात आला. सदर निर्णयाचे सर्व उपस्थितांनी स्वागत केले.

श्री.देवतळे, मालक प्रतिनिधी यांनी चंद्रपूर कार्यालयातील अधिकाऱ्यास सदर शासन निर्णयाबाबत माहिती नसल्याचे व त्यामुळे नोंदीत बांधकाम कामगारांच्या मुलांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित असल्याची खंत व्यक्त केली. त्यावर मा.अध्यक्षांनी सदर शासन निर्णयाबाबत सर्व जिल्हा कार्यालयास याआधीच कळविण्यात आले असल्याचे सांगितले. तथापि, चंद्रपूर कार्यालयास तसे पुन्हा एकदा कळविण्यात येईल असेही ते म्हणाले. शासन निर्णय दि.१८०६.२०१४ नुसार कार्यवाही करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.

**मुद्दा क्र.३)नोंदित बांधकाम कामगारांना भेटवस्तू ऐवजी रोख रक्कम रु.३,०००/- आरटीजीएस / धनादेशाद्वारे वाटप केल्याबाबतचा दिनांक २६ मे, २०१४, ३० मे २०१४ व १८ जुन २०१४ रोजीच्या शासन निर्णयाबाबत.**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना दिनांक ०८.०७.२०१३ रोजीच्या बैठकीत ५ भेटवस्तू देण्याचा ठराव करण्यात आला होता. तथापि, सदर वस्तूंची मानके निश्चित न झाल्यामुळे सदर वस्तूंऐवजी प्रत्येक नोंदीत बांधकाम कामगारास रु.३०००/- रोख रक्कम त्याच्या बँक खात्यावर आरटीजीएस/धनादेशाद्वारे अदा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला व त्यानुसार दिनांक २६.०५.२०१४ च्या शासन निर्णयानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आल्याचे मा.अध्यक्षांनी सर्व उपस्थितांस सांगितले.

प्रथमत: सदर लाभ दिनांक ३१.०३.२०१४ रोजी मंडळात नोंदीत असलेल्या बांधकाम कामगारास देण्यात यावा, असे सदर शासन निर्णयात नमूद करण्यात आले होते. तथापि, दिनांक १८.०७.२०१४ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकानुसार दिनाक ३१.०८.२०१४ रोजी नोंदणी जीवित असलेल्या सर्व बांधकाम कामगारांना सदर योजनेचा लाभ देण्यात यावा, असे शुध्दीपत्रक काढण्यात आले आहे, असेही मा.कामगार आयुक्तांनी सर्वांना सांगितले.

श्री.डोंगरे, कामगार प्रतिनिधी यांनी असे प्रतिपादन केले की, नोंदीत बांधकाम कामगारांना द्यावयाच्या वस्तू या जीवनावश्यक वस्तू आहेत. त्या वस्तूंऐवजी रोख रक्कम वाटप केल्यास त्या पैशांनी कामगार वस्तू खरेदी करेलच असे नाही. यामुळे मागील बैठकीत देखील रोख रक्कम वाटपास सर्व सदस्यांनी विरोध दर्शविला होता. तसेच श्री.डोंगरे, सदस्य तज्ञ समिती यांनी असे सांगितले की, नोंदित बांधकाम कामगारांना रु.३०००/- रक्कम देणे ऐवजी ५ भेटवस्तू देण्यात याव्यात. यावर मा.कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, प्रत्येक ठिकाणच्या लोकांच्या गरजा व पसंती वेगवेगळया असतात. त्यामुळे मंडळामार्फत देण्यात येणाऱ्या वस्तू त्यांच्या पसंतीस उतरतीलच असे

नाही, याउलट सदर वस्तू खरेदीसाठी रोख रक्कम दिल्याने ते आपल्या पसंतीच्या वस्तू खरेदी करु शकतील, असा विचार करुन सदर प्रस्ताव शासनास पाठविला होता व त्यानुसार शासनाकडून मंजूरी देखील मिळाली असून शासन निर्णय दि.२६.०५.२०१४ निर्गमित झाला आहे. सदर रक्कम वाटपाचे काम जिल्हास्तरावरुन चालू असल्यहाचेही मा.कामगार आयुक्तांनी स्पष्ट केले. शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले.

**मुद्दा क्र.४) मंडळाच्या कामगार नोंदणीच्या, संगणकीकरणाचे काम बाह्य यंत्रणेद्वारे करुन घेण्याबाबत.**

मा.कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाकडे प्रत्येक जिल्हयासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग नसल्याने बांधकाम कामगारांची हव्या त्या प्रमाणात मंडळाकडे नोंदणी झालेली नाही. सदर नोंदणी वाढावी व नोंदणीबाबत सर्व अद्यावत माहिती नेहमी उपलब्ध व्हावी, यासाठी नोंदणीचे काम बाह्ययंत्रणेद्वारे करुन घेण्याचा प्रस्ताव त्यांनी उपस्थितांसमोर मांडला. यामुळे नोंदणी कामाचे संगणकीकरण होऊन त्याबाबतची संपूर्ण व अद्ययावत माहिती प्रत्येक जिल्हा कार्यालय व मंडळाचे मुख्यालयातील अधिकाऱ्यास मिळू शकेल. तसेच मंडळाकडे एकूण किती बांधकाम कामगार नोंदीत आहेत, त्यापैकी किती बांधकाम कामगारांची नोंदणी जीवित आहे, इत्यादी माहिती नियमित उपलब्ध होऊ शकेल. तसेच नोंदीत बांधकाम कामगारांची नोंदणी जीवित राहण्यास मदत होईल व पूर्न नोंदणी करतानाही सदर माहितीचा उपयोग होईल.

सदर प्रकल्प Construction Labour Welfare Management System (CLWMS) नावाने ओळखला जाईल. सदर प्रकल्प Public Private Partnership (PPP) मोडेल अंतर्गत खाजगी कंपनी मार्फत राबवला जाईल. सदर प्रोजेक्ट अंतर्गत खाली बाबी अंतर्भूत केल्या जातील.

१. संगणकीय आज्ञावली बनवणे, चालवणे व त्याची देखभाल करणे.

२. योग्य त्या विविध संगणकीय सामुग्रीचा पुरवठा करणे.

३. इंटरनेट जोडणी व त्या संदर्भात योग्य पध्दतीने आयोजन करणे.

४. संबधित नोंदणी योजनेचे आयोजन आणि प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन बांधकाम कामगारांना माहिती देणे.

५. Bio-Metric पध्दतीने बांधकाम कामगारांची नोंदणी करणे.

६. बांधकाम कामगारांच्या Database चे व्यवस्थापन करणे.

७. प्रत्येक बांधकाम कामगारास नोंदणी कार्ड उपलब्ध करुन देणे.

८. विविध बिल्डर / डेवलपर यांची नोंद करणे.

९. संबंधित राज्य / जिल्हा कार्यालयीन सरकारी अधिकाऱ्यांशी योग्य तो समन्वय साधने.

१०. जिल्हा कार्यालयाकडून नोंदणी / नोंदणी नुतनीकरण परवानगी घेणे.

११. बांधकाम कामगारांना स्थानिक पातळीवर विविध योजनांची माहिती देऊन त्या लाभ योजना संदर्भात योग्य ती कार्यवाही करणे.

१२. योजने अंतर्गत मिळणाऱ्या लाभासंदर्भात कामगारांना जिल्हा कामगार कार्यालयाकडून परवानगी मिळवून देणे.

१३. संबधित लाभार्थी रक्कम खातेधारकांच्या बँक खात्यात जमा करण्यासंदर्भात योग्य ती काळजी घेणे.

१४. राज्य तसेच जिल्हा कार्यालयाला वेळोवेळी अहवाल उपलब्ध करुन देणे.

थोडक्यात सदर प्रकल्पाअंतर्गत, नोंदणी पासून ते विविध योजना अंतर्गत बांधकाम कामगारांस मिळणाऱ्या लाभापर्यंत संपूर्ण कार्य अपेक्षित आहे. खाजगी कंपनीस (PPP धारकास) प्रत्येक नोंदणी व्यवहाराप्रती (transaction) तसेच लाभार्थी देयकाच्या व्यवहाराप्रती (transaction) शुल्क देण्याचे अभिप्रेत आहे.

सदर कामासाठी बाह्ययंत्रणेची नियुक्ती ई-निविदेद्वारे करण्यात येईल व निवड झालेल्या एजन्सीस ॲक्टीविटी बेस्ड पेमेंट करण्यात येईल, असेही ते म्हणाले. यावर श्री.ढवळे यांनी सदर प्रकल्पासाठी मंडळाचे स्वतंत्र सर्व्हर घेण्यात यावे असे सुचविले. त्यास सर्वांनी सहमती दर्शवून मंडळाच्या कामगार नोंदणीच्या संगणकीकरणाचे कामासाठी बाह्ययंत्रणेची (PPP) नियुक्ती ई-निविदेद्वारे करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.

**मुदा क्र.५) शासनाच्या निदेशानुसार मंडळाच्या विविध योजनांबाबत केलेल्या जाहिरातींच्या खर्चासाठी मंजुरी देणेबाबत.**

मा.अध्यक्ष यांनी शासनाच्या निदेशानुसार मंडळाच्या योजनांची विविध माध्यमांतून जाहिरात करण्यात आली असल्याचे उपस्थित सदस्यांना सांगितले. शासन पत्र दि.२६.०५.२०१४ व दिनांक २०.०६.२०१४ नुसार रु.२५.०० कोटीच्या जाहिरात करण्यास शासनाने निदेश दिले आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामध्ये एस.टी. बसेसच्या पाठीमागील जाहिराती, बेस्ट बसेसच्या साईड व बॅकपॅनलवरील जाहिराती, बेस्ट बसेसमधील एल.सी.डी.वरील जाहिराती, बेस्ट बसेसच्या साईड व बॅकपॅनलवरील जाहिराती, एस.टी.महामंडळाच्या आगारातील होर्डिंग्जवरील जाहिराती, विविध वर्तमानपत्रातील जाहिराती, लोकन ट्रेनमधील एल.सी.डी.डिस्प्लेवरील जाहिराती, मोबाईल व्हॅनद्वारे बांधकामांच्या ठिकाणी जाहिराती, बेस्ट बस स्टॉपवरील जाहिराती इत्यादीचा समावेश असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावर श्री.सारडा व श्री.देवतळे यांनी असा आक्षेप घेतला की, पृथ्वी असोसिएटस् यांनी एस.टी.बसेसच्या मागील बाजूवर केलेल्या जाहिरांतीचा दर्जा मागील वर्षाच्या तुलनेत खालावला आहे. ॲग्रीमेंटनुसार जितक्या बसेसवर जाहिराती केल्या पाहिजे तितक्या प्रमाणात जाहिराती केल्याचे दिसत नाही. तसेच मागील वर्षी त्यांनी पत्र्याच्या बोर्डावर जाहिराती लावल्या होत्या. तथापि, यावर्षी केवळ फ्लेक्स बसेसवर चिकटवल्याचे दिसून येते. सबब, मे.पृथ्वी असोसिएटस् यांनी सदर जाहिरातीचे काम व्यवस्थित पार पाडल्याचे दिसून येत नाही. म्हणून या गोष्टींची शहानिशा करण्यासाठी मंडळामार्फत एक उप समिती बनवून त्यांनी दिलेल्या

अहवालानंतरच मे.पृथ्वी असोसिएटस् यांची देयके देण्यात यावीत असे श्री.सारडा यांनी प्रस्तावित केले. तथापि, अशा प्रकराच्या कोणत्याही उप समित्या बनविण्याची कायद्यात तरतुद नसल्याचे सांगून मा.अध्यक्षांनी जाहिरातींबाबत विशिष्ट प्रकारची तक्रार असल्यास सदस्यांनी तक्रार द्यावी व त्यानुसार शहानिशा करण्यात येईल, यास सर्व सदस्यांनी संमती दर्शविली. तसेच शासनाचे पत्र दि.२६.०५.२०१४ व दि.२०.०६.२०१४ नुसार करण्यात आलेल्या जाहिरात खर्चास सर्वानुमते मान्यता दिली.

मंडळाने आतापर्यंत केलेल्या जाहिराती व्यतिरिक्त यापुढे टी.व्ही.द्वारे, एफ.एम.रेडिओ व वर्तमानपत्रात जाहिराती देऊन मंडळाकडील नोंदणी वाढविता येईल असे श्री.ढवळे व श्री.सारडा यांनी सुचविले. त्याचप्रमाणे राज्यातील ग्रामपंचायत कार्यालयात माहिती फलकाद्वारे जाहिराती करता येतील असे श्री.देवतळे यांनी सुचविले. टी.व्ही.द्वारे, एफ.एम.रेडिओ, ग्रामपंचायत कार्यालयात माहिती फलकाद्वारे व विविध वर्तमानपत्र इत्यादीद्वारे रु.१५ कोटीचा निधी जाहिरातीसाठी देण्यात यावेत असे सर्वानुमते ठरले. तसेच सदर जाहिरातीसाठी मंडळाच्या अंदाजपत्रकात रु.१५ कोटींची वाढीव तरतूद करण्याचे सर्वानुमते ठरले.

**मुद्दा क्र.६) <u>मंडळाचे मुख्यालय तसेच प्रत्येक जिल्ह्यांच्या ठिकाणी बाह्य यंत्रणेद्वारे कर्मचारी नियुक्त करणेबाबत.</u>**

मंडळाचा जिल्हास्तरावर व मुख्यालय स्तरावर स्वतंत्र कर्मचारी वर्ग नसल्याने कामगार आयुक्त कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून मंडळाचे कामकाज अतिरिक्त स्वरुपात करुन घेतले जाते, असे मा.कामगार आयुक्त यांनी सांगितले. शासन निर्णय दिनांक ४.१०.२०१३ अनुसार मंडळासाठी मुख्यालयात व विभागीय स्तरावर भरती करण्यासाठी ५६ पदे मंजूर झालेली आहेत. तथापि, सदर पदांची भरती अद्याप झालेली नाही. स्वतंत्र कर्मचारी वर्ग नसल्याने मंडळाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडता येत नाही. कामगार विभागाचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून मंडळासाठी बाह्ययंत्रणेमार्फत कर्मचारी नियुक्त करण्यास्तव शासनाने दिनांक १८ जून,

२०१४ च्या शासन निर्णयाद्वारे मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्हा कार्यालयात मंडळाचे कामकाज पाहण्यासाठी एक लिपिक व एक डाटा एन्ट्री ऑपरेटर तसेच प्रत्येक विभागासाठी १ लिपिक व १ डाटा एन्ट्री ऑपरेटर आणि मंडळाच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये ३ लिपिक व ३ डाटा एन्ट्री ऑपरेटर अशी पदे कंत्राटी पध्दतीने बाहय यंत्रणेकडून भरण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले.

**मुद्दा क्र.७) <u>मंडळाचे कार्य परिणामकारकपणे पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून मंडळाचे अध्यक्ष व सचिव यांच्यासाठी वाहने खरेदी करणे.</u>**

मंडळाचे कामकाज परिणामकारकपणे पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून मंडळाचे अध्यक्ष, सचिव व मंडळाच्या कार्यासाठी वाहनाची अत्यावश्यकता आहे, असे मा.अध्यक्षांनी प्रस्तावित केले. त्यावर मंडळ सदस्य श्री.डोंगरे यांनी प्रत्येक प्रादेशिक विभाग कार्यालयासाठी देखील एक वाहन मंडळामार्फत खरेदी करण्यात यावे असे सुचविले. सखोल चर्चेअंती मंडळाचे अध्यक्ष व मंडळाच्या कामकाजासाठी मुख्य कार्यालयात दोन इन्नोव्हा गाडया खरेदी करण्यात याव्यात, तसेच मंडळाच्या सचिवासाठी १ आणि ५ प्रादेशिक विभागासाठी प्रत्येकी १ अशा ६ स्वीफ्ट डिझायर (डिझेल) गाडया खरेदी करण्यात याव्यात, असे सर्वानुमते ठरले. तसेच यासाठी सन २०१४-१५ यावर्षाच्या अंदाजपत्रकात रु.१.०० कोटींची वाढीव तरतूद करण्याचे सर्वानुमते ठरले.

**मुद्दा क्र.८) <u>सन २०१४-२०१५ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.</u>**

मंडळाचे प्रस्तावित अंदाजपत्रक सर्व उपस्थितांसमोर ठेवण्यात आले. अंदाजपत्रकाबाबत सविस्तर माहिती सर्व सदस्यांना देण्यात आली. मा.अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की, आतापर्यंतचा कल बघता सन २०१४-१५ या वर्षात सुमारे रु.८०० कोटी एवढी रक्कम सेसच्या माध्यमातून मंडळाकडे जमा होणे अपेक्षित आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाच्या सन २०१४-१५ वर्षातील प्रस्तावित अंदाजपत्रकात रु.१५ कोटी जाहिरातीसाठी व रु.१.०० कोटी वाहन खरेदीसाठी वाढीव तरतूद करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.

मंडळाच्या सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात कन्स्ट्रक्शन अॅकेडमीची तरतूद करण्यात यावी असे मंडळ सदस्य श्री.डोंगरे व श्री.ढवळे यांनी मत मांडले. यावर कन्स्ट्रक्शन अॅकेडमी चालविण्याच्या दृष्टीकोनातून मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे सध्या मंडळाचे सशक्तीकरणावर भर देवून मंडळ सशक्त झाल्यानंतर अशाप्रकारच्या अॅकेडमीबाबत विचार करणे योग्य होईल. असे मा.अध्यक्षांनी सांगितले. सखोल चर्चेअंती मंडळाच्या सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**मुद्दा क्र.९) <u>मंडळाच्या अध्यक्षांच्या परवानगीने घेण्यात येणारे आयत्या वेळेचे विषय.</u>**

**१. मंडळाद्वारे राबविण्यात येत असलेली जनता आरोग्य व वैयक्तिक अपघात विमा योजनांबाबत :-**

मंडळाद्वारे राबविण्यात येत असलेली जनता आरोग्य व वैयक्तिक अपघात विमा योजना दिनांक ०९.०६.२०१४ रोजी बैठकीत ठरल्यानुसार रद्द न करता सदर योजनेस मुदत वाढ देण्यात यावी असे. श्री. डोंगरे, सदस्य तज्ञ समिती यांनी सांगितले.तसेच श्री.कांबळे यांनीही विमा योजनेच्या नुतनीकरणास सहमती दर्शविली. यावर मा.अध्यक्ष यांनी असे सांगितले की, मंडळामार्फत राबविण्यात येत असणाऱ्या जनता आरोग्य व वैयक्तिक अपघात विमा योजनेबाबत शासनाने व कॅगने गंभीर आक्षेप घेतलेले आहेत. शासनाने असा आक्षेप घेतलेला आहे की, मंडळाने ई-निविदा न काढता न्यु इंडिया ऍन्शुरन्स या विमा कंपनीची कोटेशनद्वारे निवड केली आहे. तसेच मंडळाच्या आरोग्य व अपघाताबाबत वेगळया योजना असतानाही आणि शासनाची राजीव गांधी जीवनदायी योजना असतानाही सदर विमा योजना का लागू करण्यात आली, याबाबतचा खुलासा शासनाने मागितला आहे. तसेच कॅगने या विमा योजनेबाबत गंभीर आक्षेप घेतलेले आहेत. कॅगचा आक्षेप असा आहे की, मंडळाने भरलेले रु.३७ कोटींचे प्रिमियम विचारात घेता कामगारांना अत्यल्प लाभ मिळालेले आहेत. Cost Benefit Ratio अत्यंत कमी आहे. तसेच मंडळाच्या आरोग्य व अपघाताबाबत समांतर योजना असताना सदर विमा

घेण्याची गरज काय होती ? विमा योजने अंतर्गत मिळालेले लाभ विचारात घेता मंडळाने केलेल्या रु.३७ कोटी रुपये यांचा खर्च वाया गेला असा आक्षेप कॅगने घेतलेला आहे.

शासनाच्या पत्रानुसार या योजनेबाबत मागविलेला अहवाल मंडळाचे अध्यक्ष तथा कामगार आयुक्त यांनी त्यांचे पत्रे दिनांक २४.०७.२०१४ अन्वये शासनास सविस्तर अहवाल पाठविलेला आहे, असे मा.अध्यक्षांनी प्रतिपादन केले. तसेच आता पर्यंत विमा कंपनी अंतर्गत सुमारे ३.५ कोटींचा लाभ झालेला आहे, असे मा.अध्यक्ष यांनी प्रतिपादन केले तसेच सदर प्रकरणी कन्सल्टंट L & G यांची नियुक्ती तत्कालीन आयुक्त यांनी निविदा काढुन त्यांची नियुक्ती एक वर्षासाठी केलेली आहे. तथापि, ऍश्युरन्स विमा कंपनीची निवड शासनाच्या धोरणानुसार ई-निविदा न काढता कोटेशनद्वारे न्यु इंडिया ऍश्युरन्स कंपनीची निवड केलेली आहे. यावर श्री.डोंगरे यांनी आतापर्यंत विमा कंपनीमार्फत सुमारे ४ कोटींचा लाभ देण्यात आला असल्याचे सांगितले. तसेच विमा काढणे म्हणजे त्याचा लाभ मिळालाच पाहिजे असे नसते, असेही ते म्हणाले. यावर मा.अध्यक्षांनी असे सांगितले की, शासनाच्या धोरणानुसार १० लाखांपेक्षा जास्त खर्चाच्या प्रक्रियेसाठी ई-निविदा काढणे अत्यावश्यक आहे, म्हणून सदर विमा योजना राबवायची असल्यास नव्याने ई-निविदा काढून विमा कंपनीची निवड करावी लागेल, असे मा.अध्यक्षांनी सांगितले. तसेच मा.अध्यक्ष यांनी असेही सांगितले की, सध्याच्या विमा कंपनीनी नुतनीकरणाचा प्रस्ताव दिला असून यावर्षी रु.३७ कोटी ऐवजी रु.२० कोटींमध्ये सदरचे काम करण्याचे त्यांनी प्रस्तावित केले आहे.

श्री.डोंगरे,सदस्य यांनी असे सांगितले की, शासनाच्या उपक्रम असलेल्या चार विमा कंपन्या आहेत आणि या चारही विमा कंपन्यांकडून कोटेशन्स घेऊन विमा कंपनीची नियुक्ती केलेली आहे. या कोटेशन्सद्वारे न्यु इंडिया ऍश्युरन्स कंपनीची नियुक्ती केलेली आहे. आता न्यु इंडिया ऍश्युरन्स कंपनीने सदर काम ३७ कोटी ऐवजी २० कोटींमध्ये करण्याचे प्रस्तावित केले आहे. तसेच न्यु इंडिया ऍश्युरन्स कंपनीस बांधकाम कामगारांच्या विमा योजनेबाबत १ वर्षाचा अनुभव आलेला आहे. नव्याने विमा कंपनी नियुक्त केल्यास परत त्या कंपनीस माहिती होण्यास वेळ लागेल आणि त्यामुळे या

अनुभवी विमा कंपनीचे रु.२० कोटींच्या सुधारीत प्रस्तावास मान्यता देण्यात यावी असे श्री.डोंगरे यांनी नमूद केले. **यावर सविस्तर चर्चा होवून सदर प्रकरणी कन्सल्टंट L & G यांची नियुक्ती निविदा काढून झालेली असल्यामुळे आणि त्यांच्या सल्ल्याने न्यु इंडिया ऍश्युरन्स कंपनीची नियुक्ती झालेली आहे. त्यामुळे बांधकाम कामगारांच्या हिताच्या दृष्टीकोनातून कन्सल्टंट L & G आणि न्यु इंडिया ऍश्युरन्स कंपनीने दिलेल्या सुधारीत रु.२० कोटींच्या प्रस्तावानुसार ३ वर्षाच्या कालावधीसाठी बहुमताने मान्यता देण्यात येत आहे. सदर योजना तात्काळ चालू करावी, असे बहुमताने ठरले.**

**२. मंडळाच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत असणे -**

मंडळाच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत असणे अत्यावश्यक आहे व त्यासाठी एम.एम.आर.डी.ए. / सिडको यांच्याकडून प्लॉट घेऊन मंडळासाठी इमारत बांधण्याबाबत विचार व्हावा असे मा.अध्यक्षांनी सांगितले. त्यावर श्री.डोंगरे यांनी मंडळासाठी तयार इमारत विकत घेण्यात यावी असे प्रस्तावित केले. मा.अध्यक्षांनी एम.एम.आर.डी.ए. / सिडको यांच्याकडून प्लॉट घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत इमारत बांधल्यास अधिक योग्य होईल, असे प्रतिपादन केले. यावर सखोल चर्चेअंती एम.एम.आर.डी.ए. / सिडको यांच्याकडून प्लॉट घेवून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधकाम करुन घेण्यात यावे, असे सर्वानूमते ठरले.

**३. मंडळासाठी टोल फ्री सेवा सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव -**

श्री.डोंगरे यांनी मंडळासाठी टोल फ्री सेवा सुरु करण्याबाबत प्रस्ताव मांडला. मंडळाकडे नोंदीत बांधकाम कामगारांना त्यांच्या विविध तक्रारीबाबत विचारणा करण्यासाठी किंवा अद्याप नोंदीत न झालेल्या बांधकाम कामगारांना मंडळाबाबत व योजनांबाबत माहिती देण्यासाठी सदर सेवेचा उपयोग होईल असेही त्यांनी स्पष्ट केले. यावर मा.अध्यक्षांनी श्री.डोंगरे यांना सदर प्रस्ताव कामगार आयुक्तालयात सादर करण्यास सांगितले.

**४. नोंदित कामगारांच्या पाल्यास लॅपटॉप वाटप न करण्याबाबतचा प्रस्ताव -**

मा.अध्यक्ष यांनी असे सांगितले की, मंडळाच्या नोंदित कामगारांच्या पाल्यास लॅपटॉप वाटपासाठी ५० लॅपटॉप खरेदी करण्यात आले आहेत. तथापि, कामगारांच्या पाल्यांना लॅपटॉप वाटपाच्या बाबीस शासनस्तरावरुन अंतिम मान्यता प्राप्त न झाल्यामुळे सदरचे लॅपटॉप कामगारांच्या पाल्यांना वाटप करता येत नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच सदर लॅपटॉप मंडळाच्या कामकाजासाठी प्रत्येक जिल्ह्यास वितरीत करावे असे शासन स्तरावरुन समक्ष सांगण्यात आले असल्याचे मा.अध्यक्षांनी नमुद केले. यावर सविस्तर चर्चा करण्यात आली व चर्चेअंती सदर ५० लॅपटॉप पैकी प्रत्येकी १ लॅपटॉप प्रत्येक जिल्हा कार्यालयास व प्रादेशिक विभागीय कार्यालयास आणि उर्वरित मंडळाच्या मुख्य कार्यालयास असे वाटप करण्याचे सर्वानुमते ठरले.

**५.नोंदीत कामगारांच्या पाल्यास शैक्षणिक उपयोगाची पुस्तके वाटप करण्याबाबतचा प्रस्ताव -** श्री.देवतळे व श्री.ढवळे यांनी नोंदीत कामगारांच्या पाल्यास शैक्षणिक उपयोगाची पुस्तके वाटप करण्याबाबतचा प्रस्ताव मांडला. सखोल चर्चेअंती नोंदीत बांधकाम कामगारांच्या पाल्यास रु.१,०००/- रकमेपर्यंतची शैक्षणिक उपयोगाची पुस्तके भेट देण्याचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला. नोंदित बांधकाम कामगारांच्या पाल्यास द्यावयाच्या रु.१,०००/-पर्यंतची शैक्षणिक उपयोगाच्या पुस्तकांची निवड अध्यक्ष तथा कामगार आयुक्त यांनी करावी असे सर्वानुमते ठरले.

**६. कर्मचाऱ्यांस १० टक्के भत्ता देण्याबाबतचा प्रस्ताव -**

श्री.डोंगरे यांनी सध्या मंडळाकडे स्वतंत्र कर्मचारीवृंद नसल्याने कामगार आयुक्त कार्यालयातील जे कर्मचारी मंडळासाठी काम करतात त्यांना १० टक्के भत्ता मंडळाच्या प्रशासकीय खर्चाअंतर्गत देण्यात यावा, असा प्रस्ताव मांडला. सदर प्रस्तावाचे सर्वांनी स्वागत केले व त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**७. मंडळाच्या कल्याणकारी योजनांबाबत माहिती पुस्तिका तयार करण्याबाबतचा प्रस्ताव -** दि.०९.०६.२०१४ रोजी झालेल्या तज्ञ समितीच्या बैठकीमध्ये मंडळाच्या कल्याणकारी योजनांबाबत माहिती पुस्तिका तयार अशी चर्चा झाल्याचे मा.अध्यक्षांनी सांगितले. तसेच अशी पुस्तिका तयार करुन महाराष्ट्रातील सर्व नगरसेवक, आमदार, खासदार व इतर लोकप्रतिनिधी यांना आणि विविधि शासकीय कार्यालयांस वाटप केल्यास मंडळाच्या योजनांची चांगल्या प्रकारे प्रसिध्दी होऊ शकेल असे मा.अध्यक्षांनी सांगितले. श्री. देवतळे यांनी अशा प्रकारच्या योजनांबाबत पुस्तिका काढल्यास योजनांची प्रसिध्दी चांगल्याप्रकारे होईल असे नमुद केले. याबाबत सखोल चर्चेअंती मंडळाच्या योजनांच्या माहिती पुस्तिकेच्या १ लाख प्रति छापून घेण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**८. शासकीय अधिकाऱ्यांना सेस कलेक्टर, असेसिंग ऑफिसर्स व ॲपिलेट ऑफिसर्सचे काम करणेबाबतचा प्रस्ताव -**

श्री.देवतळे यांनी सर्व नगरपालिका व शासकीय अधिकारी उदाहरणार्थ सार्वजनिक बांधकाम विभाग, सिंचन विभाग यांना सेस गोळा करण्याबाबत कळवावे, असे सांगितले. मा.अध्यक्षांनी असे सांगितले क्री, शासनाच्या दि.१६.०४.२००८ च्या अधिसूचनेनुसार विविध विभागातील अधिकाऱ्यांस सेस कलेक्टर, असेसिंग ऑफिसर्स आणि ॲपिलेट ऑफिसर्स म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या सर्व सेस कलेक्टर्स व असेसिंग ऑफिसर्स यांनी नियमाप्रमाणे सेसची आकारणी करुन, सेस गोळा करणे अपेक्षित आहे. याबाबत या सर्व अधिकाऱ्यांना पत्र पाठवून पुनश्चः सूचना देण्यात येतील, असे मा.अध्यक्षांनी सांगितले.

बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न बघता मंडळाच्या निर्णयांची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.

सर्व मान्यवरांचे आभार मानून बैठक संपल्याचे मा.अध्यक्षांनी घोषित केले.

कामगार आयुक्त तथा अध्यक्ष,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई.

सचिव,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई.